**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

---

**दिनांक 11.10.2018 गुरूवार**

**(गुन्हे)**

**1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मुदाका अन्वये 21 केसस 21 आरोपींना अटक करून 22,839 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 11 केसस 11 आरोपींना अटक करून 9,462 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा—या 36 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 581 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क 2,81,900 रू वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**2) पो.स्टे. गिट्टीखदान, धंतोली, — पळवुन नेणा—या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

**1) गिट्टीखदान** — दिनांक 10.10.18 चे 1030 वा ते 1100 वा दरम्यान पो.स्टे गिट्टीखदान हद्यीत राहणा—या फिर्यादी यांची 10 वर्षीय अल्पवयीन मुलगी ही बाहेर खेळायला गेली ती घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळुन आली नाही. तिला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लावुन पळवुन नेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे गिट्टीखदान येथे पोउपनि इंगोले, यांनी कलम 363 भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**2) धंतोली** — दिनांक 09.10.2018 चे 1430 वा चे सुमारास पो.स्टे धंतोली हद्यीत राहणा—या फिर्यादी या कामावर गेल्या असता त्यांची 11 वर्षीय अल्पवयीन मुलगी ही घरी होती फिर्यादी यां कामावरून परत आल्यानंतर त्यांची मुलगी दिसुन आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळुण आली नाही. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे धंतोली येथे सपोनि परदेशी, 8975761121 यांनी कलम 363 भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**3) पो.स्टे जरीपटका — चोरी :**

दिनांक 07.10.18 चे 1000 वा ते 10.10.18 चे 1000 वा दरम्यान फिर्यादी चंद्रशेखर लक्ष्मण कोसे, वय 35 वर्ष, रा. मुदलीयार ले आउट, बोरकर आटा चक्की जवळ, नागपुर यांनी पो.स्टे जरीपटका हद्यीत चावला चौक गोविंद मेडीकल फार्मसी समोर मेनरोड वर केबलचे ड्रम ठेवले असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने काळया रंगाचा 305 मिटर केबल किंमती 2,44,000 रू चे चोरून नेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे जरीपटका येथे पोहवा कमलाकर, 9823695302 यांनी आरोपीविरूध्द कलम 379 भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**4) पो.स्टे. नदंनवन — दरोडा टाकण्याचे तयारीत असणा—या आरोपीताविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 10.10.2018 चे 1800 वा चे सुमारास आरोपी कं. 1) अजिक्य अनिल चर्लेवार, वय 23, वर्ष, रा. नंदनवन, 2) आकाश अन्नाजी सोमकुंवर, वय 25 वर्ष, रा. नंदनवन झोपडपट्टी, यास वरीष्ठाचे आदेशान्वये नागपुर शहर व नागपुर ग्रामीण भागातुन दोन वर्षाकरीता हद्यपार केले असतांना सुध्दा विना परवानगी प्राणघातक शस्त्रासह मिळुन आला, 3) अक्षय शालीकराम करोती, व 26 वर्ष, नंदनवन झोपडपट्टी, 4) इमरान उर्फ भोला खान, वय 21 वर्ष, रा. सदभावना नगर, 5) सुरज नावाचा इसम हे

पो.स्टे नंदनवन हद्दीत बिडगाव आराधना नगर, आकाश सोमकुंवर याचे टिनाचे झोपडयामध्ये कोठेतरी दरोडा टाकण्याच्या तयारीत असतांना मिळुण आले. त्यापैकी आरोपी क्रं. 4 व 5 हे पळुन गेले. अटक आरोपींच्या ताब्यातुन एक तलवार, किं. 500 रू, एक एअरगण किं. 1,000 रू, एक चाकु किं. 200 रू, दोन लोखंडी सळाखी, एक मोबाईल किं. 10,000 रू व एक यामहा कंपणीची मोपेड गाडी किं. 30,000 रू असा एकुण 41,700 रू मुद्देमालासह मिळुण आल्याने त्यांचेविरूध्द कलम 399 भादवि, सह कलम 4+25 आर्म ॲक्ट, सह 142, 135, मु.पो.का अन्वये गुन्हा नोंदविला असुन आरोपी क्रं. 1 ते 3 यांना अटक करण्यात आली व आरोपी क्रं. 4 व 5 हे फरार आहे.

5) पो.स्टे. कळमणा – घरफोडी :

दि. 10.10.18 चे 1100 वा ते 2130 वा चे सुमारास पो.स्टे. कळमणा हद्दीत प्लॉट नं. 39, साई कॉलनी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी दिलीप नामदेवराजी महादुले, वय 43 वर्ष हे आपल्या घराला लॉक करून डयुटीवर गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून बेडरूममधील लोखंडी अलमारीतील सोन्याचे दागिने व मोबाईल असा एकुण 2,31,000 रू चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कळमणा येथे सपोनि डेरे, 9049625552 यांनी आरोपीविरूध्द कलम 454,457,380 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

6) पो.स्टे. सोनेगाव – जबरी चोरी :

दि. 10.10.18 चे 1830 वा चे सुमारास फिर्यादी अमोल सुरेश बानगडे, वय 31 वर्ष रा. हनुमान नगर, सुतगिरणी जवळ, हे आपली दुचाकी क्र. एमएच/40/बीएन/5338 ने वर्धावरून नागपूरला येत असतांना आरोपी आशिष महादेवराव बळीरम, वय 24 वर्ष रा. कारंजा, वर्धा याने रस्त्यामध्ये फिर्यादीस थांबवून हिंगणा पर्यत सोडून देण्यास सांगितले फिर्यादीने आरोपीस नाव व पत्ता विचारून गाडीवर बसविले. पो.स्टे. सोनेगाव हद्दीत मिहान तेलारा तलावाच्या गेटजवळ आरोपीने लघवीसाठी गाडी थांबवून आपल्या बॅगमधील चाकु काढून फिर्यादीस चाकूचा धाक दाखवून फिर्यादीची दुचाकी कि. 30,000 रू चा मुद्देमाल जबरीने हिसकावून चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. सोनेगाव येथे मपोउपनि नप्ते, 7722055441 यांनी आरोपीविरूध्द कलम 392 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

(अकस्मात मृत्यु)

पो.स्टे. कळमना, तहसिल, अजनी :

1) कळमणा – दिनांक 23.09.2018 चे 1600 वा. पुर्वी पो.स्टे कळमना हद्दीत जुनी कामठी रोड, कळमना वस्ती, नागपुर येथे राहणारा विक्की उमेश कोहाड, वय 26 वर्ष हा घराजवळ असलेल्या नाल्याच्या पुलावर बसला असतांना त्याचा तोल जावुन तो 10 ते 12 फुल पुलाचे खाली पडल्याने तो जखमी झाला. त्याला उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक 10.10.18 चे 1045 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे कळमना येथे पोउपनि सोनपरोते, 9923429340 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

2) तहसिल – दि. 10.10.18 चे 1545 वा चे सुमारास पो.स्टे. तहसिल हद्दीत टिमकी तीन खंबा, येथे राहणारे महेश जागोबाजी धोपकर, वय 35 वर्ष यांनी आपले राहते घर सिलिंग फॅनला ओढणिच्या सहायाने गळफास लावून आत्महत्या केली. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. तहसिल येथे सपोनि हिंगे, 9923070017 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

3) अजनी – दि. 11.10.18 चे 0115 वा चे सुमारास पो.स्टे. अजनी हद्दीत मेडिकल कॉलेज, दिनदयाल थाली समोर अंदाजे 65 वर्ष वयोगटातील एक अनोळखी महिला ही मृत अवस्थेत मिळून आली. याप्रकरणाी फिर्यादी अमित पुरूषोत्तम मोपीडवार, वय 35 वर्ष रा. मेडिकल क्वार्टर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. अजनी येथे पोउपनि बनसोडे, 9552509690 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर